**पत्रक**

**छत्रपती संभाजीनगरला वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रणासाठी अधिक मजबूत निरीक्षण प्रणालीची गरज: आयफॉरेस्टचा अहवाल**

“स्मॉग टेल्स: Know your city and what you breathe” ही पर्यावरणीय संशोधन संस्था इंटरनॅशनल फोरम फॉर एन्व्हायर्नमेंट, सस्टेनेबिलिटी अँड टेक्नॉलॉजी (iFOREST) ची एक जनजागृती मोहीम आहे. ही माहितीमोहिम भारतातील मध्यम आकाराच्या शहरांमधील वाढते वायुप्रदूषण अधोरेखित करते आणि लोकांनी एकत्र येऊन कृती करण्याचे आवाहन करते.

२०२४ मध्ये सुरू झालेल्या पहिल्या सिझनमध्ये या मोहिमेने “पटना, गुवाहाटी, मेरठ, बड्डी आणि चंदीगड” या उत्तर भारतातील वेगाने वाढणाऱ्या शहरांवर लक्ष केंद्रित केले होते.
या वर्षीच्या दुसऱ्या सिझनमध्ये लक्ष वेधले गेले आहे महाराष्ट्रातील वाढत्या शहरी केंद्रांकडे – ठाणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि चंद्रपूरकडे.

हिवाळ्याच्या आगमनासह आणि मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकाम आणि शहरी विस्तारामुळे वायुप्रदूषणाच्या पातळीत वाढ झाल्याचे आयफॉरेस्टच्या विश्लेषणात दिसून आले आहे.

**मुख्य निष्कर्ष**

1. **निरीक्षण केंद्रांचे अपुरे जाळे**

शहरात काही मॅन्युअल मॉनिटरिंग स्टेशन असले तरी कंटिन्युअस ॲम्बिएंट एअर क्वालिटी मॉनिटरिंग स्टेशन (CAAQMS) ची संख्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार अपुरी आहे.
शहराच्या उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील भागात निरीक्षण केंद्रांचा अभाव आहे.
शहरात प्रभावी निरीक्षणासाठी किमान ८ केंद्रे (५ CAAQMS आणि ३ मॅन्युअल) आवश्यक आहेत. सध्या आणखी २ CAAQMS केंद्रांची तातडीने गरज आहे.

2. **कणप्रदूषणाचे (PM2.5 आणि PM10) उच्च प्रमाण**

सर्व तीन निरीक्षण केंद्रांनी PM2.5 आणि PM10 या दोन्हींच्या पातळी राष्ट्रीय निकषांपेक्षा जास्त नोंदवल्या आहेत.

'रचनाकर कॉलनी' येथे सर्वाधिक प्रदूषण आढळले — जानेवारी २०२४ मध्ये PM10 ची पातळी १७४ µg/m³ इतकी पोहोचली.

'मोरे चौक – वाळूज' येथे सरासरी ६९ µg/m³ आणि 'एमआयडीसी चिकलठाणा' येथे ८९ µg/m³ इतके वार्षिक सरासरी प्रमाण नोंदले गेले, जे राष्ट्रीय मर्यादेपेक्षा अनुक्रमे १.१५ आणि १.४८ पट जास्त आहे.

3. **प्रदूषणाचे शिखर तास (Peak pollution hours)**

सायंकाळी १० ते ११ आणि सकाळी ९ ते १० या वेळेत PM2.5 आणि PM10 मध्ये झपाट्याने वाढ होते.

$SO_2$ दिवसभर कमी राहतो, तर $NO_2$ सायंकाळी ६ ते ८ या वेळेत वाहतुकीमुळे वाढतो.

4. **ऋतुनिहाय प्रवृत्ती आणि कारणे**

- हिवाळ्यात (नोव्हेंबर–जानेवारी) प्रदूषण सर्वाधिक असते, PM2.5 वार्षिक सरासरीपेक्षा ४८% अधिक आणि $NO_2$ देखील वाढलेले दिसते.
- उन्हाळ्यात (मार्च–मे) पातळी सरासरीपेक्षा सु. १२% अधिक राहते.
- पावसाळ्यात (जून–ऑगस्ट) हवा सर्वाधिक स्वच्छ आढळली, PM2.5 सुमारे ५२% नी घसरले, आणि PM10 व $SO_2$ च्या पातळ्याही सर्वात कमी नोंदल्या गेल्या.

5. **आकडेवारीतील तुटी (Data Gaps)**

छत्रपती संभाजीनगरमधील आकडेवारी इतर शहरांच्या तुलनेत कमी उपलब्ध आहे. 'मोरे चौक – वाळूज' येथील माहिती २०१९ पासून उपलब्ध असली तरी ती अपूर्ण आहे. विश्वसनीय डेटा केवळ २०२३ पासून मिळतो.

रचनाकर कॉलनी आणि इतर केंद्रांमध्ये २०२४ मधील अनेक महिन्यांचा डेटा अपुरा आहे — विशेषतः जून, जुलै आणि ऑगस्ट.

रचनाकर कॉलनी – २०२४ माहिती उपलब्धता

| महिना | PM2.5 | PM10 | $NO_2$ | $SO_2$ |
|---|---|---|---|---|
| जानेवारी | ९७% | ९७% | ९९% | ९९% |
| फेब्रुवारी | ९०% | ९०% | ९७% | ९७% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मार्च | ८६% | ८६% | ९१% | ९१% |
| एप्रिल | ७८% | ७९% | ८३% | ८०% |
| मे | ९६% | ९६% | ९७% | ९६% |
| जून | ३४% | ३४% | ३७% | ३६% |
| जुलै | ०% | ०% | ०% | ०% |
| ऑगस्ट | ४% | ४% | ४% | ४% |
| सप्टेंबर | ९९% | ९९% | ९९% | ९९% |
| ऑक्टोबर | ९८% | ९८% | ९८% | ९८% |
| नोव्हेंबर | ९६% | ९६% | ९६% | ९६% |
| डिसेंबर | ९४% | ९४% | ९५% | ९६% |

**तज्ज्ञांचे मत**

श्री. रवी ज्ञानप्रकाश चौधरी, संस्थापक व संचालक – प्रयास फाउंडेशन:
"प्रदूषणाला मुळावर आळा बसला पाहिजे — तोच खरा उपाय आहे. औद्योगिक उत्सर्जन आणि कचरा जाळणे हे शहरांना गुदमरवत आहेत.
स्वच्छ हवा ही शासनाची जबाबदारी आहे, पण नागरिकांनी ती मागणीने मिळवली पाहिजे.
फाउंटन्स आणि डस्ट-कंट्रोल उपाय तात्पुरते आहेत — खरे बदल म्हणजे सेंद्रिय कचरा व्यवस्थापन, विकेंद्रीकृत उपाय आणि चांगले प्रशासन."

डॉ. सचिन जोशी, पल्मोनॉलॉजिस्ट – श्वास क्लिनिक:
"सरकारी रुग्णालयांमध्ये श्वसन आजारांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. औद्योगिक भागातून येणारे रुग्ण प्रामुख्याने बॅक्टेरियल न्युमोनियाने त्रस्त असतात.
शाळा सुरु झाल्याने मुले थेट प्रदूषणाच्या संपर्कात आली आहेत — सतत खोकला, श्वास घेण्यास त्रास हे वाढते लक्षण आहे.
घरातील हवा देखील हानिकारक ठरते — डास मारणाऱ्या कॉईलसुद्धा वायुवीजनाशिवाय धोकादायक असू शकतात.

प्रदूषण हा अदृश्य धोका नाही — तो आता आपल्या रुग्णालयांत भरतो आहे. लोकजागृती आणि स्थानिक कृती दोन्ही गरजेचे आहेत."

श्री. निखिल निरखी, प्रिंसिपल करस्पाँडंट – महाराष्ट्र टाइम्स:
"कचरा जाळण्याची प्रथा वर्षभर सुरू असते आणि नागरिक व कामगारांना त्याच्या परिणामांची अजूनही जाणीव नाही.
वाहतूक प्रदूषण वाढले आहे आणि समृद्धी महामार्गासारख्या प्रकल्पांमुळे झाडांची कत्तल होत आहे.
शहरातील एअर क्वालिटी इंडेक्स अनेकदा १५० च्या वर राहतो आणि परिणामी न्युमोनिया व इतर श्वसनरोगही वाढले आहेत.
जनजागृती, योग्य कचरा व्यवस्थापन आणि प्रदूषणावरील कठोर कारवाई ही काळाची गरज आहे."